माझी जादूची शाळा



अभय बंग

पुस्तकाचे नाव : माझी जादूची शाळा
लेखक : डॉ.अभय बंग
मराठी अनुवाद : किशोर दरक / स्नेहल दिक्षीत
संपादन : विनया मालती हरी
चित्रकार : अविनाश देशपांडे

जवाआं / म ७२
प्रकाशन : ऑगस्ट २०२३
देणगी मूल्य : २५ रुपये

प्रकाशक : संतोष विठ्ठल शेंडकर
सचिव, भारत ज्ञान विज्ञान समुदाय (महाराष्ट्र)
३०५, आधार अपार्टमेंट, नारायण पेठ,
पुणे - ४११०३०
ई-मेल : mahabgvs@gmail.com

अक्षर जुळणी : भारती जाधव
मुद्रण : संकेत ऑफसेट, करंजेपूल


बालवाचकांसाठी
भारत ज्ञान विज्ञान
समुदायतर्फे चालवल्या
जात असलेल्या
जनवाचन आंदोलन
मोहिमअंतर्गत
प्रकाशित



माझी जादूची शाळा

लहानपणी मी एका वेगळ्या शाळेत शिकलो होतो. त्या प्रकारचं शिक्षण मी माझा मुलगा 'आनंद' याला आज देऊ शकत नाही याचं मला फार दुःख आहे. ''माझ्या लहानपणची गोष्टच वेगळी होती, आता तसं राहिलं नाही,'' अशी वाक्यं मोठ्या, म्हाताऱ्या लोकांकडून तुम्ही ऐकली असतील. तरी पण माझं मन खूप दुःखी आहे. शेवटी माझ्या शाळेत काय वेगळेपणा होता?

नववीपर्यंत माझं शिक्षण, गांधीजींच्या शिकवण्याच्या नवीन पद्धतीनुसार झालं. त्यापैकी चार वर्षे मी सेवाग्रामच्या आश्रमशाळेत घालवले. निसर्गापासून दूर जाऊन वर्गाच्या चार भिंतीत कैद होऊन कुठला तरी कंटाळा आणणारा अभ्यासक्रम शिकणे म्हणजे शिक्षण नव्हे. याउलट गांधीजींच्या शिक्षणपद्धतीत निसर्गाच्याजवळ राहून, समाज उपयोगी काम करून बुद्धीचा विकास होईल आणि त्यातून मुलं नवीन कौशल्यं शिकतील. या पद्धतीने विकासासाठी गांधीजींच्या आग्रहावरून रवींद्रनाथ ठाकूरांनी शांतिनिकेतनमधून श्री.आर्यनाथकम आणि श्रीमती आशादेवी या सिंहली-बंगाली जोडीला सेवाग्रामला पाठवलं होतं. याच कारणासाठी गांधीजींच्या शिक्षणपद्धतीला रवींद्रनाथांचं निसर्ग व कलेबद्दलचं प्रेम मिळालं. शाळेच्या सुरूवातीपासूनच माझे आई-वडिल या प्रयोगात सामील होते. या शाळेतल्या शिकवण्याच्या पद्धती एकदम नवीन होत्या. याच पद्धतीची काही उदाहरणं मी आता सांगतो.



आज आपण सगळ्या जनावरांच्या संरक्षणाबद्दल बोलतो, पण २७ वर्षापूर्वी या बाबीची एवढी चर्चा नव्हती. त्यावेळेस आमचे मराठीचे शिक्षक पाटील गुरूजी त्यांचा तास फणसाच्या झाडाच्या फांदीवर बसून घेत असत. ते आम्हांला जंगलाच्या गोष्टी व स्वतःची शिकारीची वर्णनं ऐकवतं. एकदा त्यांनी चुकून गर्भवती हरिणीवर गोळी चालवली. त्या गरीब प्राण्याच्या डोळ्यातल्या वेदना पाहून त्यांना वाईट वाटलं आणि त्यांनी बंदूक सोडून कॅमेऱ्याने प्राण्यांचे फोटो काढायचं ठरवलं. त्यांनी रात्ररात्र जागून मचाणावर बसून प्राण्यांचे फोटो काढले. त्यांच्या रसाळ गोष्टीतून प्राण्यांबद्दलचं प्रेम दिसून येतं. त्यांच्या गोष्टी ऐकून आम्ही जंगलात फिरतोय असं आम्हाला वाटे. ते शब्दांचे शिल्पकार होते. शब्दांमधून जंगल डोळ्यापुढं उभं करत. जंगलाबद्दलचं माझं प्रेम आणि माहिती याच गोष्टीमुळे वाढली. आजकाल मराठी भाषेचा धडा प्राणी म्हणजे पशू या वाक्याने सुरू होतो. परंतु अशा नीरस आणि कंटाळवाण्या पध्दतीने आपण मुलांना प्रेरित करू शकू का? महाराष्ट्रातला गडचिरोली जिल्हा आजही जंगलाने भरलेला आहे. पण तिथेसुध्दा शालेय शिक्षणाचा जंगलांशी काहीच संबंध नाही.

संतांचा मेळावा



संत तुकारामांचे अभंग आम्हाला कडू औषधासारखे प्यावे नाही लागले. आषाढी एकादशीला आमच्या शाळेत दरवर्षी संतांचा मेळावा होत असे. त्यामध्ये विविध संतांच्या जीवनावर नाटकं होत, चित्रे काढली जात, लेख-निबंध लिहिले जात. हे सगळं काम शाळेची सगळी मुलं मिळून करत. १५ दिवस शाळेला जत्रेचं स्वरूप येत असे. तुकारामांचा एक अभंग 'जे का रंजले गांजले' मी तिथे तीन वेगळ्या प्रकारांनी शिकलो. तिथल्या गीतमंडळात मी पहिल्यांदा राग भैरवी गायला शिकलो. संतांची वाणी, त्यांचा इतिहास, त्यांचं जीवन-दर्शन हे सगळे आम्ही सहजतेने खेळातून शिकलो. फरक एवढाच होता की तिथे शिकण्यामध्ये भाषा, इतिहास, संगीत आणि नाटक ही लेबलं चिकटलेली नव्हती.

बऱ्याच वर्षानंतर मी जेव्हा एका सरकारी शाळेत गेलो तेव्हा तिथे 'काव्य कुसुमांजली' नावाच्या पुस्तकात मला संत तुकारामांचा 'जे का रंजले गांजले' हा अभंग दिसला. तो अभंग पाहून तुकाराम स्वतः दुःखी झाले असते!

वनस्पतीशास्त्र असे शिकलो

बऱ्याच शाळांतून वनस्पतीशास्त्र विषय पुस्तकात छापलेल्या चित्रांतून किंवा काचेच्या बाटल्यातून कैद नमुन्यांद्वारा शिकवला जायचा. रोपांच्या वेगवेगळ्या जातीच्या मुळांची आणि पानांची अवघड नावं मुलं बऱ्याच श्रमानंतर पाठ करतात आणि परीक्षेनंतर लगेच विसरून जातात. आमच्या शाळेजवळ बागेत व शेतात विविध प्रकारची झाडंझुडपं होती. सगळ्यात चांगली गोष्ट ही की आमचे शिक्षक सगळ्या मुलांना बरोबर घेऊन या बागेत हिंडत असत. तिथे झाडांचं निरीक्षण होई. जी झाडंझुडपं दिसत त्यांच्या नावाशी पहिल्यांदा परिचय करून दिला जाई. नंतर त्यांची पानं, फळं, फुलं यांचं बारकाईने निरीक्षण केलं जाई. नंतर बोरे, आवळे करवंदे ही फळे तोडून खात असू (वर्गामध्ये अशाप्रकारे खाद्यपदार्थ चाखून किंवा खावून शिकण्याचा दुसरा अनुभव मला अमेरिकेत मिळाला. पण तिथे वर्गात बसून चॉकलेट खात व कोकाकोला पीत!) फळं खाता खाता आम्ही बोरं व आंब्याच्या साधर्म्यावर चर्चा करत असू आणि डूप नावाच्या फळाच्या वेगळेपणावर चर्चा करत असू. अशाप्रकारे बागेत हिंडून आणि जवळून निसर्ग पाहिल्यामुळे आम्ही वनस्पतीशास्त्र चांगल्याप्रकारे शिकू शकलो. पुस्तकांमध्ये असलेले सिद्धांत आमच्या चारही बाजूंला हिरव्यागार रूपात अस्तित्वात होते, आणि हे सिद्धांत प्रत्यक्ष पाहून त्यांचा पडताळा घेण्याची प्रेरणा आम्हांला शिक्षकांनी दिली. याच कारणासाठी 'पामेट डायव्हर्जेंट रेटिक्युलेट' सारखे शब्द मला अवघड वाटले नाहीत, कारण माझ्याजवळ डोळ्यांसमोर पपईच्या झाडाचं पान होतं.

सातवीच्या परीक्षेसाठी आमच्या शिक्षकांनी वेगवेगळ्या पानं व फुलांचा एक अल्बम बनवायला सांगितला. आम्ही त्यासाठी आमचा परिसर हिंडलो. आज २५ वर्षांनंतरसुद्धा सेवाग्रामच्या परिसरात कुठे कुठे 'पामेट डायव्हर्जेंट रेटिक्युलेट' आकाराची पानं आहेत ते मी सांगू शकतो. असं वाटतं की ही सगळी झाडं माझ्या डोळ्यासमोर उभी आहेत. याचा परिणाम असा झाला की, नंतर कॉलेजच्या दिवसांत मला वनस्पतीशास्त्र शिकायला फार मेहनत करावी लागली नाही. या विषयात मी कॉलेजमधे पहिला आलो. जेव्हा माझे शिक्षक यामुळे माझी प्रशंसा करायला लागले तेव्हा मी त्यांना म्हणालो, "सर वनस्पतीशास्त्र तर मी माझ्या सेवाग्रामच्या शाळेतच शिकलो."



जीवनाशी संबंध जोडणारं गणित



"एका पाण्याच्या टाकीला तोट्या आहेत. एका तोटीतून टाकीत पाणी भरलं जातं आणि दुसऱ्या तोटीतून बाहेर येतं, तर सांगा की टाकी किती वेळात भरेल ?"

अशा प्रकारचे आगापिछा नसलेले निरर्थक प्रश्न नेहमी गणिताच्या पुस्तकात असतात. आता प्रश्न असा आहे की गणित व आपलं जीवन यात काही संबंध आहे की नाही? हा प्रश्न सोडवण्यसाठी कुठलाही हुशार माणूस खालची तोटी बंद करेल. माझ्या शाळेत मी आयताचं क्षेत्रफळ व गणित कशाप्रकारे शिकलो बघा - दररोज आम्हा लोकांना तीन तास काहीतरी उपयोगी काम करणं आवश्यक होतं. इथल्या शिक्षणाचं ते एक अभिन्न अंग होतं. याच्यामागे 'ब्रेड लेबर' म्हणजे स्वतः श्रम करून जेवण मिळविणे ही गांधीजींची आणि समाज उपयोगी कामांतून आपलं कौशल्य वाढविण्याची विनोबांची दृष्टी पण होती. यासाठी मी काही दिवस गोशाळेत काम करू लागलो. नवीन गोशाळेत काम चालू होतं. माझ्या शिक्षकांनी मला एक प्रश्न दिला, "हे शोध की एक गाय रोज किती पाणी पिते. अशा प्रकारे गोशाळेतल्या सगळ्या गाईंना रोज किती पाणी लागेल? मग अशी टाकी बांधा ज्यात तितकं पाणी मावू शकेल. टाकी बांधायला किती वीटा लागतील याचा हिशेब करून खरेदी करा." टाकीचं घनफळ व बाहेरचं क्षेत्रफळ कसं मोजायचं? या वेगळ्या पद्धतीमुळे मी प्रत्यक्ष टाकी बांधून गणित शिकलो.

जेवण बनवणे : एक शिक्षण

कामाच्या माध्यमातून विज्ञान शिक्षणाचं आणखी एक उदाहरण मी देतो. विद्यार्थ्यांना क्रमाने जेवण बनवण्याची जबाबदारी दिली जाई. शाळेच्या स्वयंपाकघरात रोज १०० लोक जेवत. जेवण बनवण्याची जबाबदारी क्रमाक्रमाने लोकांच्या एका टोळीला दिली जाई. खाण्यावर एका महिन्याला किती खर्च व्हायला पाहिजे याचं अंदाजपत्रक पण त्या गटाला दिलं जात असे. आहारशास्त्राच्या दृष्टीने संतुलित भोजन, ते सगळ्यांना आवडणारं असावं, याची योजना बनवता बनवता आम्हाला बराच विचार करावा लागे. बटाट्याची भाजी सगळ्यात स्वस्त होती, पण त्यात पौष्टिक तत्व म्हणून स्टार्च होतं त्यामुळे ती नाकारावी लागते. आय.सी.एम.आर. (इंडियन कौन्सिल फॉर मेडिकल रिसर्च) ने सांगितलेल्या कमीत कमी तेलाच्या वापरावर तर सगळं बजेट खर्च होत होते. कुशल गृहिणीच्या अनुभवापासून आम्ही वंचित होतो. मग आहारशास्त्र आणि अर्थशास्त्राशी झुंजत काही उपाय शोधायचा आम्ही प्रयत्न करत असू.

बऱ्याचदा जेवणाची बनवलेली योजना कागदावरच राही. ती प्रत्यक्षात उतरवणं शक्य नसे. डाळ शिजायला किती वेळ लागेल या हिशेबात आम्ही नेहमी चुकत असू. मग रात्री जेवणाची भांडी घासताना, आम्ही एखाद्या जखमी सैनिकासारखे वाटत असू, आणि दुसऱ्या दिवशी काय शिजवायचं? प्रश्न आ वासून उभा राहात असे. या सगळ्या प्रक्रियेत आम्ही तीन गोष्टी शिकलो आहारशास्त्र, अर्थशास्त्र आणि पाकशास्त्र.




कोथिंबीरीच्या हिरव्या पानांमध्ये १०,६०० युनिट व्हिटॅमीन असतं हे आजपण माझ्या लक्षात आहे. ज्या गोष्टी मी काही दिवस स्वयंपाकघरात काम करून शिकलो त्या मी १० वर्षात मेडिकल कॉलेज-मध्ये शिकू शकलो नाही!

शेतीचे प्रयोग

आम्हा सर्व विद्यार्थ्यांना शेतीसाठी जमिनीचा एक-एक छोटा तुकडा दिला होता. त्याची नांगरट, बी-पेरणी, पाणी घालणे, खत घालणे याची जबाबदारी आमच्यावर होती. विहिरीतून पाणी काढण्यासाठी पोरांची लांब रांग लागायची. त्यामुळे बऱ्याचदा रात्री नंबर यायचा. अर्ध्या रात्री कोल्हेकुईमुळे मुलांना भीती वाटे तरी पण मोठ्या हिंमतीने ते शेतात पाणी घालायला जात. शेती करता करता आम्ही अॅग्रोनोमी व फळांच्या शेतीचं ज्ञान मिळवलं. खत टाकताना त्याच्या रासायनिक तत्त्वांचा विचार करावा लागे. त्यासाठी आम्ही शेतकऱ्यांशी जाऊन बोलणी करत असू. यामध्ये जपानमधून प्रगत शेतीचा अभ्यास केलेले मुक्तेश्वरभाई व द्राक्षशेतीचा प्रयोग करणारे प्रेमभाई पण होते. आमच्या जवळच इस्त्राईलमधे बरीच वर्षे शेतीचे तंत्र शिकून आलेल्या श्री.हलेवी यांच शेत होतं. ते बैलांच्या ऐवजी घोड्यांच्या मदतीने शेती करत. मध्येच अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे शेतीसंबंधित अर्थशास्त्राचे नवीन प्रयोग सुचवत. अशा परिस्थितीत शेती करता करता काय नाही शिकलो ?

कोणाच्या शेतात जास्ती पिकेल ही आमची सर्वात मोठी स्पर्धा होती. शेतीत उत्पादन वाढविण्यासाठी आम्ही भरपूर म्हणजे अक्षरशः बादल्या भरभरून खत घालायचो. अशाप्रकारे खत घालून मी उगवलेल्या एका वांग्याचं वजन पावणेदोन किलो भरलं. ते वांगं घेऊन जेव्हा वर्धा बाजारात विकायला गेलो तेव्हा त्याच्यावर रोग पडला असं समजून कुणी खरेदीच केलं नाही.



जिवंत शिक्षण

या नव्या पद्धतीवर नेहमी एक आरोप केला जातो. शारीरिक श्रमात बराच वेळ दवडल्यामुळे विद्यार्थी ज्ञानार्जन नीट करू शकत नाहीत. मद्रास प्रांतात जेव्हा मूलभूत शिक्षण सुरू झालं तेव्हा लोक म्हणू लागले की शारीरिक श्रमांमुळे मुलांचा अभ्यास मागे पडत चाललाय. या आरोपांमुळे तत्कालीन मुख्यमंत्री राजाजी यांना राजीनामा द्यावा लागला होता. पण या आरोपांमध्ये खरंच काही तथ्य आहे का? मुलांच्या डोक्यात वाट्टेल ती भाराभर माहिती भरून परीक्षेपुरती ओकण्याला जे लोक खरं शिक्षण मानतात, त्यांना हा आरोप नक्कीच खरा वाटेल. उदा. जर विद्यार्थ्याला गंधकाम्ल बनवण्याच्या चार पद्धती माहिती नसतील तर त्यांचं ज्ञान कच्चं आहे असं या गटाचं मानणं आहे. मात्र नववीच्या विद्यार्थ्याला या माहितीचा काय उपयोग आहे याच्याशी त्यांचं काही देणं घेणं नाही. खरं तर जीवनाशी संबंधित ज्ञानविज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रात अशा शाळेमध्ये विद्यार्थी नेहमीच जास्ती कुशल असायचे परंतु इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, सामान्यज्ञान अशा विषयांचं काय?

माझ्या जादूच्या शाळेत मी औपचारिक पद्धतीने भूगोल कधीच शिकलो नाही. सेवाग्राममध्ये जगभरातून बरेच लोक यायचे. त्यांच्याकडून ऐकून विविध देश आणि प्रांतांविषयी मी बरंच काही शिकलो. मला देशोदेशींची टपाल तिकीट गोळा करण्याचा छंद होता.

यामुळे मला विविध देशांची बरीच रंजक माहिती मिळायची. बरीचशी प्रवासवर्णनं आणि देशोदेशींच्या

गोष्टी वाचून त्या त्या देशांच्या भूगोलाचा चांगला अंदाज आला होता. ही होती माझी भूगोल शिकण्याची पद्धत. नववीत असताना मी शरद्चंद्रांचं 'पथेर दावी' आणि झवेरचंद्र मेघांचं 'प्रभू पधारे' या कादंबऱ्या वाचल्या होत्या. त्यामुळे मला ब्रह्मदेशाचा चांगला परिचय झाला. या दोन्ही पुस्तकांतून मिळालेल्या प्रेरणेमुळेच एक दिवस मी ब्रह्मदेशाला गेलो. माझ्यासाठी भूगोल हा बोजड नव्हे तर जिवंत विषय होता.

राजकारण आणि सामान्यज्ञान शिकवण्यासाठीसुद्धा आमच्या शिक्षकांनी वेगळा मार्ग अवलंबिला होता. रोज संध्याकाळी ते वर्तमानपत्रांतील खास बातम्या आणि रंजक माहिती वाचायचे. रशियाने क्युबामध्ये पाठविलेली अण्वस्त्रे आणि ती थांबविण्यासाठी अमेरिकेने केलेली कार्यवाही ही तेव्हाची एक प्रमुख बातमी होती. दुसऱ्या महायुद्धानंतर जवळजवळ संपूर्ण जग भांडवलशाहीवादी आणि साम्यवादी अशा दोन गटात वाटले गेले. आमचे शिक्षक आम्हाला अमेरिका अन् रशिया यांच्या शत्रुत्वाची कारणं समजावून द्यायचे आणि क्युबाच्या क्रांतीचे महत्वदेखील सांगायचे. स्वित्झर्लंडचे लोक आपल्याच देशाला 'हेल्वेटिया' का म्हणतात हा प्रश्न तिकीटं गोळा करताना मला पडला. याच्या उत्तरासाठी बरीच पुस्तक वाचावी लागली आणि स्वित्झर्लंडचा इतिहासदेखील बऱ्यापैकी कळला.

नवी पद्धत

गांधीजींचे शिक्षणासंबंधी विचार आणि रवींद्रनाथांचे कला विचार यांना प्रत्यक्षात आणण्यासाठी आमच्या शाळेत अनेक सृजनशील प्रयोग केले गेले. याची अनेक उदाहरणे देता येतील. परीक्षेतल्या प्रश्नांखेरीज आमची अनेक प्रकारची परीक्षा असायची. जेवण बनविणे, नाटक लिहून त्याचा प्रयोग करणे, सभेमध्ये भाषण देणे, लेख लिहिणे इत्यादी. सर्वात महत्त्वाचे म्हणजे शाळेतली 'वर्ग' ही कल्पनाच खूप लवचिक बनवली होती. सगळेच विद्यार्थी काही विषयांमध्ये खूप कुशल असायचे आणि काहींमध्ये यथातथा.

विद्यार्थ्यांनी प्रत्येक विषयानुसार एकेक विषय शिकण्यासाठी वेगवेगळ्या वर्गांमध्ये जायचे. उदा. मी एकाच वर्षी इंग्रजीला सातवीत, गणिताला नववीत आणि मराठीला दहावीत होतो. चांगले संस्कार आणि मूल्य हा तर या शिक्षणाचा एक अविभाज्य भाग होता. कष्टाचा आदर, स्वावलंबन, समता आणि सामूहिकता अशा गोष्टी तर आमच्या शाळेतल्या जगण्याचा भाग होता. आणि या सोबतच देशातल्या विविध समाजपरिवर्तन आंदोलनात पण विद्यार्थी भाग घ्यायचे. दरवर्षी काही दिवस शाळा बंद ठेवून सगळी मुलं भूदान आंदोलनात भाग घेण्यासाठी दूरदूरच्या गावांमधे जायची.

आज जेव्हा मी या माझ्या शाळेविषयी सांगतो तेव्हा बरेच लोक म्हणतात की त्यांनादेखील आपल्या मुलांना या शाळेत पाठवायला आवडेल. माझ्या शाळेचा हा शेवटचा किस्सा मला तुम्हाला सांगायचा आहे.

गांधीजींच्या ग्रामोद्योगाच्या कल्पनेला सरकारी प्रोत्साहन मिळू शकलं नाही. शेवटी मोठ्या कारखान्यांच्या स्पर्धेत ग्रामोद्योग हरायला लागले. या शाळेलादेखील



शासकीय मान्यता मिळाली नाही आणि म्हणून ही शाळा आजच्या शिक्षणव्यवस्थेत टिकू शकली नाही. शासकीय मान्यता नसलेल्या शाळेतल्या मुलांच्या भविष्याचं काय? यामुळे पालकांनी आपल्या मुलांना पाठवणं बंद केलं. भूदान-ग्रामदान आंदोलनात सक्रिय असलेल्या बऱ्याच पालकांनी आपल्या मुलांना या शाळेत घातलं होतं. पण त्यांनीही नंतर मुलांना काढून घेतलं. समाज आणि शासन या वेगळ्या शाळेचं आणि तिथल्या अभिनव पद्धतीचं

योग्य मूल्यमापन करू शकले नाहीत. अशा परिस्थितीत परिवर्तनाची ही बेटं जास्ती काळ तग धरू शकली नाहीत. आजूबाजूच्या विरोधी वातावरणानं माझ्या शाळेला गिळंकृत केलं. नंतर ग्रामदान आंदोलनदेखील संपुष्टात आलं. समाजातला प्रचंड स्वार्थ आणि टोकाची स्पर्धा हे या अद्‌भूत बेटाच्या नाशाचे कारण ठरले. मला मनापासून वाटतं की, माझ्या मुलाला त्या शाळेत पाठवावं पण ही जादूची शाळा आता आहे कुठे?



प्रश्न विचारा पुन्हा पुन्हा
प्रश्न विचारा पुन्हा पुन्हा असेच का अन् तसेच का?
शिकणे कधी संपत नाही होऊ द्या लाख चुका?
कुत्र्याची शेपूट वाकडी का?
पेंग्वीनची मान तोकडी का?
क्रिकेटची बॅट लाकडी का?
सापाची चाल वेडीवाकडी का?
वटवाघुळ रात्री फिरतात का?
मासे पाण्यात तरतात का?
पतंग दिव्यावर मरतात का?
काजवे चमचम करतात का?
खोकल्याची उबळ येते का?
सर्दीत नाक गळते का?
मेंदूला वास कळतो का?
आठवणीने उचकी लागते का?
रंगीत तारे दिसतात का?
दिवसा तारे दिसतात का?
जीवसृष्टी कुठेतरी असेल का?
माणसासारखा माणूस दिसेल का?

जनवाचन आंदोलन



भारत ज्ञान विज्ञान समुदाय

मूल्य : रू. २५